वर्ष-०७ अंक-०५ मुंबई, मंगळवार २२ ते २८ डिसेंबर-२०२० पृष्ठ-४

मूल्य २/- रुपये

# पोलीस बातमी पत्र

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक • कार्यकारी संपादक : गुरु प्रसाद नाईक • सह संपादक : सौ. डॉ. अश्विनी नाईक

PG 2
मिरारोड पोलीसांनी अत्यंत संवेदनशिल व गांभीर्याने तपास करुन अपहरण झालेल्या ०२ अल्पवयीन मुलीस रागावल्या मुळे मैत्रिणीसह कुणास

3 → चिंता वाढतेय; मुलींचा जन्मदर घटतोय!

करोना महामारीत डब्बेवाल्यांचे आश्रय दाते मेकिंग दी डिफरेंस एनजीओ ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## सावळज येथे 13 लाख लंपास




सावळज (ता. तासगाव) येथील एका डाक्टर दाम्पत्याच्या घरातून तेरा लाख रुपयांची चोरी झाल्याचा प्रकार घडला आहे. याप्रकरणी घरात काम करणाऱ्या महिलेविरुद्ध तासगाव पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला ...पान २ वर...

## निवृत्त पोलिस अधिकाऱ्याच्या मुलावर पाचजणांकडून खुनी हल्ला



शहरातील शामरावनगर येथील स्वराज्य चौक परिसरात एका निवृत्त पोलिस अधिकाऱ्याच्या ...पान २ वर...

# मुंबई मेट्रोची कामे दर्जेदार आणि वेळेत पूर्ण करा - मुख्यमंत्री उद्धव ठाकरे

***मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी चारकोप मेट्रो डेपो येथे मेट्रो ट्रायल रनच्या तयारीची पाहणी केली. पाहणी केल्यानंतर मुंबई मेट्रो प्रकल्प मुंबईकरांसह, महाराष्ट्रासाठी महत्वाकांक्षी असा आहे.***

प्रगतीपथावरील कामांचा आढावा घेतला तसेच मेट्रो मार्गिका चाचणी इंजिनची पाहणी देखील केली. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आज मुंबई मेट्रोच्या अंधेरी एल-सेव्हन स्थानक, अकुर्ली केली. या दरम्यान त्यांनी अंधेरीतील प्रस्तावित गुंदवली आणि त्यानंतर कांदिवली येथील मेट्रो स्थानकांच्या कामांची पाहणी केली, तसेच विविध कामांच्या प्रगतीचा आढावा घेतला. चारकोप मेट्रो



त्यामुळे या प्रकल्पातील कामे दर्जेदार आणि वेळेत पूर्ण करावीत, असे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी रविवारी दिले. यावेळी मेट्रोच्या मेट्रो स्थानक, दहिसर रेल्वे उड्डाण पूल (मेट्रो रेल ब्रिज), चारकोप मेट्रो डेपो आणि डि.एन. नगर मेट्रो स्थानक येथे भेट देऊन कामांची पाहणी डेपोतील मेट्रोच्या इंजिनची मेट्रो मार्गिकांवरील चाचणीच्या तयारीबाबतही या भेटीत पाहणी केली. यावेळी एमएमआरडीएचे आयुक्त ...पान २ वर...




**मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली मेट्रो ट्रायल रनच्या तयारीची पाहणी मेट्रोच्या प्रगतिपथावरील कामांचा आढावा, मेट्रो मार्गिका चाचणी इंजिनची पाहणी**

## सायबर पोलिसांचं आवाहन

**WhatsApp येणाऱ्या 'या' लिंकवर क्लिक करू नका**




देशासह राज्यात कोरोनाचा प्रादुर्भाव सुरू असताना देश लॉकडाऊन केला गेला. लॉकडाऊन दरम्यान अनेकांच्या नोकऱ्या गेल्यात. त्यामुळे कित्येक जण बेरोजगार झाले. कोरोना परिस्थिती नियंत्रणात आल्यानंतर अनेक जण नोकरी आणि रोजगार शोधण्यासाठी शहरांकडे वळू लागले. परंतु बेरोजगारीच्या संकटाचा फायदा उचलून काही जण सोशल मीडियातील व्हॉट्सअपच्या माध्यमातून कित्येकांची खासगी माहिती चोरून त्याआधारे आर्थिक फसवणूक करत असल्याचे प्रकार उघडकीस आला आहे.

कोरोनादरम्यान, सोशल मीडियावरील अफवा आणि व्हायरल होणाऱ्या खोट्या बातम्यांचे प्रमाण देखील वाढले होते. मिळालेल्या माहितीनुसार, विविध विषयांसदर्भातील अफवा सोशल नेटवर्किंगच्या माध्यमातून व्हायरल केल्या जात आहेत. अशीच एक अफवा सध्या चर्चेत आहे ती म्हणजे घरबसल्या मोबाईलचा वापर करुन दिवसाला काही हजार कमवा. मात्र अशा अफवांना नागरिकांनी बळी पडू नये, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. असा आहे ...पान २ वर...

# मिरा-भाईंदरच्या RTO उपकेंद्र कार्यालयाचा उद्घाटन सोहळा

प्रादेशिक परिवहन कार्यालय ठाणे अंतर्गत मिरा-भाईंदर मधील स्थानिक आमदार प्रताप सरनाईक व पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अथक प्रयत्नाने R T O उपकेंद्र कार्यालयाचा उद्घाटन सोहळा दिनांक. २१/१२/२०२० रोजी मिरा- भाईंदर घोडबंदर येथे नव्याने महाराष्ट्र राज्याचे परिवहन व संसदीय कार्यमंत्री एडवोकेट अनिल परब यांच्या हस्ते पार पडला.सदर कार्यक्रमात खासदार राजन विचारे, आमदार गीता जैन, जिल्हा-प्रमुख प्रभाकर म्हात्रे, स्नेहल कंसारीया, परिवहन आयुक्त अविनाश ढाखणे, रवींद्र गायकवाड, अतिरिक्त आयुक्त श्री. डोले साहेब, पोलीस उप-आयुक्त संजय कुमार पाटील, साळुंके साहेब, विजयाआनंद सागर, जयंत पाटील, विहन शिंदे, प्रवीण पाटील, निलम धवन आणि अधिकारी उपस्थित होते.सातत्याने पाठपुरावा करून कार्यालयाची जागा उद्घाटनणासाठी उपयुक्त करण्यात आली. गेली सात-आठ वर्षे अथक प्रयत्न करून मिरा-भाईंदरचे आमदार प्रताप सरनाईक यांनी मिरा-भाईंदरच्या नागरिकांना ठाण्याला जाण्याची गरज न लागावी याकरिता परिवहन कार्यालय उपलब्ध करून दिले आहे. या सुविधांमुळे मिरा-भाईंदरकरांना ठाण्याची पायपीट करावी लागणार नाही आणि लवकरच या सुविधांचा त्यांना लाभ घेता येणार आहे.




# सायन कोळीवाडा येथे बंद घरात गॅस सिलिंडरचा स्फोट; कोणीही जखमी नाही

लालबाग येथे गॅस सिलिंडरचा स्फोट होऊन मोठी जीवित हानी झाल्याची घटना ताजी असतानाच सोमवारी सकाळी ११.४० वाजताच्या सुमारास सायन कोळीवाडा येथील एका चाळीतील बंद घरात गॅस सिलिंडरचा भीषण स्फोट झाला. सुदैवाने या घटनेत कोणीही जखमी झालेले नाही. यासंदर्भात, मुंबई अग्निशमन दलाचे प्रमुख अधिकारी कैलास हिवराळे यांच्याकडे विचारणा केली असता, सायन कोळीवाडा, कोकरी आगार,



डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, रावळी कॅम्प येथील एका चाळीतील बंद घरात सोमवारी सकाळी ११.४० वाजताच्या सुमारास घरगुती गॅस सिलिंडरमधून गॅस गळती होऊन भीषण स्फोट झाला, अशी माहिती त्यांनी दिली.


या गॅस सिलिंडरच्या स्फोटामुळे आजूबाजूचा परिसर हादरला. सदर घराच्या भिंती, छप्पर , भांडी आदींचे नुकसान झाले. तर स्फोटामुळे आग लागल्याने त्यात घरातील काही सामान, इलेक्ट्रिक वायर आदी जळाले. या घटनेमुळे परिसरात काहीसे भितीचे वातावरण निर्माण झाले होते. या घटनेची माहिती मिळताच, अग्निशमन दलाच्या जवानांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन मदतकार्य सुरू केले. यावेळी, अग्निशमन दलाने पोलिसांच्या उपस्थितीत प्रथम बंद घराचा टाळा तोडला व आपले मदतकार्य सुरू केले, असे कैलास हिवराळे यांनी सांगितले. याप्रकरणी, स्थानिक पोलीस व अग्निशमन दलाचे अधिकारी हे अधिक तपास करीत आहेत.

## बनावट क्रीडा प्रमाणपत्र; एकास अटक



औरंगाबाद, नागपूर शहरातील मानकापूर पोलिसांनी बोगस क्रीडा प्रमाणपत्र प्रकरणात अकराव्या संशयित आरोपीला नांदेड जिल्ह्यात अटक केली आहे. मात्र औरंगाबाद पोलिसांकडून या प्रकरणातील तपास अजूनही सुरू झालेला नाही. औरंगाबाद प्रमाणेच नागपूर शहरातील मानकापूर पोलिस ठाण्यात बोगस क्रीडा प्रमाणपत्र प्रकरणाचा तपास सुरू करण्यात ...पान २ वर...

## पोलिस कर्मचाऱ्याने घेतला गळफास



नागपूर, शांतीनगर पोलिस ठाण्यात तैनात पोलिस शिपायााने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना शनिवारी दुपारी गिट्टीखदानमधील पोलिस वसाहतीत उघडकीस आली. या घटनेने पोलिसांमध्ये खळबळ उडाली आहे. हर्षल केशवराव लेकुरवाळे (वय ३४) असे मृतकाचे नाव आहे. आत्महत्येपूर्वी त्यांनी लिहिलेली चिठ्ठी पोलिसांनी जप्त केली. त्याबाबतचा तपशील देण्यास पोलिस नकार देत आहेत. अधिकाऱ्याच्या जाचाला ...पान २ वर...

# मीरा भाईंदर परिसरात रिकाम्या बेस्ट व एसटी बसेस चा सुळसुळाट






**भाईंदर पूर्व व पश्चिम रेल्वे स्थानकाबाहेर एम बी एम सी,बेस्ट,एसटी,शिवशाही अश्या अनेक प्रकारच्या रिकाम्या बसेस पार्किंग करून नागरिकांना त्रास देत आहेत वेळोप्रसंगी रुग्णवाहिकेला ही जाण्यासाठी जागा नसते उभ्या मालकी वाहनांना या बसेस घासून जातात व सादर चा परिसर आपलाच आहे असे मिरवतात अनेक रिक्षा मालकी वाहने याला बळी पडतात या मुळे ट्राफिक पण मोट्या प्रमाणात होते रस्त्याच्या दोन्ही बाजूला बसेस उभ्याकरून सामान्य नागरिकाला पायी चालणे अवघड होते त्याच प्रमाणे दुकानदार दुकानाच्या बाहेर रस्त्यावर उभ्या दुचाकी पार्क करतात या मुळे जेष्ठ नागरिक,लहान मुले महिला याना बाहेर खरेदीला जाताना या त्रासाचा सामना करावा लागतो प्रशासनाने या कडे लक्ष देणे अत्यंत गरजेचे आहे**

# सीसीटीव्हीने टिपला वाहतूक पोलिस



नागपूर : पिंपरी चिंचवडमध्ये वाहतूक शाखेच्या एका महिला पोलिसाच्या खिश्यात पैसे ठेवतानाचा व्हिडीओ व्हायरल झाल्याची घटना ताजी असताना, नागपुरातही आडोशाला 'संशयास्पद स्थितीत' असलेला वाहतूक पोलिस सीसीटीव्हीने टिपला. या प्रकरणाच्या चौकशीनंतर वाहतूक शाखेचे उपायुक्त सारंग आवाड यांनी या वाहतूक पोलिसाला तडकाफडकी निलंबित केले. गोकुल पवार असे निलंबित पोलिसाचे नाव आहे. ते वाहतूक शाखेच्या सीताबर्डी झोनमध्ये तैनात होते. काही दिवसांपूर्वी पवार हे ...पान २ वर...

# मिरारोड पोलीसांनी अत्यंत संवेदनशिल व गांभीर्याने तपास करुन अपहरण झालेल्या 02 अल्पवयीन मुलीस रागावल्या मुळे मैत्रिणीसह कुणास

दिनांक १७/१२/२०२० रोजी शांतीपार्क मिरारोड येथील महिला फिर्यादीची वय १५ वर्षाची अल्पवयीन मुलगी व तिची वय १५ वर्षाची अल्पवयीन मैत्रीण यांचे कोणीतरी अज्ञात इसमाने अपहरण केल्याचे तक्रारीवरुन मिरारोड पोलीसांनी तात्काळ अज्ञात इसमाविरुध्द मिरारोड पोलीस ठाण्यात कलम ३६३ प्रमाणे अपहरणाचा गुन्हा दाखल करुन पोनि/संदीप कदम यांचे मार्गदर्शनात मिरारोड पो.स्टेच्या विषेश तपास पथकाने गुन्हयाचा तपास संवेदनशिलपणे व गांभीर्याने करत तांजीक विष्लेशन व गोपणीय माहीती प्राप्त करुन पिडीतांचा मिरारोड, अंधेरी, जुहु बिच या भागात शोध घेवुन जुहु अंधेरी, मुंबई येथुन गुन्हा दाखल झाल्याच्या अवघ्या ०५ तासांत शोधुन सुरक्षीत त्यांच्या पालकांच्या ताब्यात दिल्या असुन, तपासमाध्ये पिडीत मुलीच्या आईने मुलीस रागावल्यामुळे मैजीनीसह कुनास काहीएक न सांगता निघुन गेल्या होत्या असे निष्पन्न झाले आहे. सदरची कामगीरी पोलीस उप आयुक्त, मिरा भाइंदर, सहाय्यक पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग, पोनि/संदीप कदम यांचे मार्गदर्शनाखाली मिरारोड पोलीस ठाण्याचे सपोनि/तेजश्री शिदे, सपोनि/शिवकुमार गायकवाड, पोहवा/आदक, पोना/सावंत, पोशि/पारधी, पोशि/केदार, महोम/निसाळ, महोम/भोये यांनी केली आहे. २ किलो ४०० ग्रॅम गांजासह आरोपीस विरार पोलीसांनी केली अटक दिनांक १६/१२/२०२० रोजी एक इसम अंमली पदार्थ विक्री करण्याकरीता फुलपाडा, स्मशानभुमी, विरार पुर्व येथे येणार आहे अशी गोपणीय बातमी मिळाले वरुन विरार पो.स्टे. चे पोनि/भाउसाहेब अहीर यांचे मार्गदर्शनात पथकाने सदर ठिकाणी सापळा लावला असता आरोपी वय ४८ वर्षे, रा. जिवदानी पाडा, विरार पुर्व याचे कब्जात ०२ किलो ४०० ग्रम वजनाचा एकुण २७,९६५/ रुपये किमंतीचा गांजा अंमली पदार्थ बेकायदेशीर रित्या विक्री करीता बाळगला असतांना मिळुन आल्याने जप्त करुन आरोपीस ताब्यात घेवुन आरोपी विरुध्द विरार पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १०६२/२०२० एनडीपीएस अक्ट कलम ८(क), २२(ब)॥(ब) प्रमाणे गुन्हा दाखल करुन कारवाई करण्यात आली आहे. सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त, विरार, सहा.पोलीस आयुक्त, विरार, पोनि/भाउसाहेब अहेर पो.स्टे. विरार यांचे मार्गदर्शनात पोउपनि/संदेश राने, पोउपनि/मनेष साबळे व पथकानी यांनी केली आहे.

# मोटर सायकल ट्रायल करीता नेवुन पळून जावुन विश्वासघात करना या चोरटयास मानिकपूर पोलीसांनी राजस्थान येथून केली अटक.




नागलाईवाडी, गडनाका, सालोली वसई येथे रहाणारे श्री. अँसील्टन अंथोनी परेरा यांनी त्यांचे मालकीची ktm rc 390 390 मोटर सायकल क्रमांक MH.02.EN.7425 विक्री करीता त्यांचे फेसबुक अकाऊंटवरील मार्केटप्लेस या अपवर दिनांक ०६/१२/२०२० रोजी मोटर सायकलचा फोटो टाकून जाहीरात दिली. सदर जाहीरात पाहून लकी राजपुत नावाचे ईसमाने फिर्यादीशी फेसबुकवरुन संपर्क साधून दिनांक १२/१२/२०२० रोजी वसई पश्चिम बाभोळा नाका येथील मकडोनल्डस जवळ भेटुन मोटारसायकल खरेदी करन्या बहाणा करुन ट्रायल घेण्यासाठी मोटर सायकल घेवुन जावुन माघारी न येता फिर्यादीचा विश्वासघात केला. बाबत फिर्यादीचे तक्रारीवरुन माणिकपुर पोलीस ठाण्यात गु.र.क्र. ४०७/२०२० भा.दं.वि.सं.कलम ४०६ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. पोनि/राजेंद्र कांबळे यांचे मार्गदर्शनात पोउपनि/उमेश भागवत व पथकाने नमुद गुन्हयाच्या तांजीक तपास करुन आरोपी निष्पन्न करुन गुन्हे शाखा वसई युनीट यांच्या मदतीने आरोपी वय २० वर्षे, रा. हमेरीपाल, ता कुंभलगड, जि राजसमन्द , राज्य राजस्थान येथुन दिनांक १७/१२/२०२० रोजी अटक करुन गुन्हयातील KTM RC 390 मोटर सायकल क्रमांक MH.02.EN.7425 किमत १००,०००/ रुपयेची हस्तगत केली आहे. सदरची कामगीरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उपायुक्त, वसई, श्रीमती. अश्विनी पाटील, सहा. पोलीस आयुक्त वसई विभाग, पोनि/राजेंद्र कांबळे, माणिकपुर पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनात पोउपनि/उमेश भागवत, पोशि/ हेमंत कोरडे तसेच गुन्हे शाखा, वसई युनीटचे पोहवा/१५०३ मंगेश चव्हाण, पोहवा/ १३१ विकास यादव, पोना/२५९ प्रशांत पाटील, पोका/११८७ शरद पाटील यांनी केली आहे

# रिक्षा-टॅक्सी भाडेवाढ अटळ?



मुंबई : गेली पाच वर्षे न मिळालेली भाडेवाढ आणि करोनामुळे बसलेल्या आर्थिक फटक्यामुळे परिवहन विभागाने काळ्या-पिवळ्या रिक्षासाठी किमान २ रुपये, तर टॅक्सीसाठी ३ रुपये भाडेवाढ प्रस्तावित केली आहे. याबाबतचा निर्णय मंगळवार, २२ डिसेंबरला होणाऱ्या मुंबई महानगर प्रदेश परिवहन प्राधिकरणाच्या बैठकीत होण्याची शक्यता आहे. भाडेवाढ झाल्यास प्रवाशांच्या खिशाला कात्री लागणार आहे.

रिक्षा-टॅक्सी भाडेवाढीसाठी खटुआ समितीचे सूत्र वापरले जाणार आहे. या समितीच्या शिफारशी शासनाने स्वीकारल्याने त्यातील भाडेदरासंदर्भात शिफारशींवरही होणाऱ्या बैठकीतही चर्चा केली जाणार आहे. शिफारशींमध्ये टॅक्सीसाठी सवलतींचे आठ टप्पे, तर रिक्षासाठी चार टप्पे, काळ्या-पिवळ्या टॅक्सी सेवेत आठ किलोमीटरच्या पुढील टप्प्यासाठी १५ ते २० टक्के सवलत, भाडेदर दोन पटींपर्यंतच वाढवण्याची मुभा, मुंबई महानगर क्षेत्रात मध्यरात्री १२ ते पहाटे ५ पर्यंत रिक्षा-टॅक्सीला भाडेवाढ नाही इत्यादींचा यात समावेश असेल.

भाडेवाढीसंदर्भात २२ डिसेंबरला परिवहन प्राधिकरणाच्या बैठकीत चर्चा होणार असून समितीकडून याबाबत अंतिम निर्णय घेतला जाणार असल्याचे परिवहन आयुक्त अविनाश ढाकणे यांनी सांगितले.

यापूर्वी रिक्षा-टॅक्सी भाडेवाढ प्रत्येक वर्षी जूनमध्ये सरकारने नेमलेल्या हकीम समितीच्या सूत्रानुसार होत होती. या भाडेवाढीबाबत प्रवासी नाराजी व्यक्त करत असत. मात्र सरकारने हकीम समिती बरखास्त करून त्याऐवजी एकसदस्य खटुआ समिती स्थापन केली. या समितीने ऑक्टोबर २०१७ मध्ये ३०० पानी अहवाल सादर केला होता. त्यानंतर हा अहवाल स्वीकारण्यास काही कालावधी लागला होता. भाडेवाढीबाबत याच समितीचे सूत्र व शिफारशी लागू करण्यावर आता विचार के ला जात आहे. मुंबई ग्राहक पंचायतीनेही भाडेवाढीला विरोध दर्शविलेला नाही. परंतु प्रवाशांच्या खिशाला मोठी कात्री नको, अशी सूचनादेखील के ली आहे.

दरवाढ अशी..

सध्या काळ्या-पिवळ्या रिक्षाचे किमान भाडे १८ रुपये, तर टॅक्सीचे २२ रुपये भाडे आहे. रिक्षाच्या भाडेदरात दोन रुपये आणि टॅक्सीच्या भाडेदरात तीन रुपयांची वाढ प्रस्तावित के ली आहे. त्यामुळे रिक्षाचे भाडे २० रुपये आणि टॅक्सीचे भाडे २५ रुपये होईल. याबाबतचा अंतिम निर्णय मात्र प्राधिकरणाच्या बैठकीत होणार आहे.

# ५० लाखांच्या करोना विम्यास खासगी डॉक्टरही पात्र?



मुंबई : करोनाकाळात कर्तव्य बजावताना मृत्युमुखी पडलेल्या खासगी डॉक्टरांचे कुटुंबीय प्रधानमंत्री गरीब कल्याण निधी योजनेअंतर्गत आरोग्य सेवकांना देण्यात येणाऱ्या ५० लाख रुपयांच्या विम्यासाठी पात्र आहेत का,

अशी विचारणा उच्च न्यायालयाने केली आहे. तसेच केंद्र सरकारने याबाबत दोन आठवडय़ांत भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले आहेत.

बाधितांवर उपचार करताना करोनाची लागण होऊन मृत्युमुखी पडलेल्या नवी मुंबईतील खासगी डॉक्टरच्या पत्नीला न्यू इंडिया अॅशुरन्स कंपनीने प्रधानमंत्री गरीब कल्याण निधी योजनेअंतर्गत लाभ देण्यास नकार दिला. त्यानंतर याचिकाकर्तीने उच्च न्यायालयात धाव घेत या योजनेअंतर्गत लाभ देण्याचे आदेश देण्याची मागणी केली आहे.

करोनाच्या सुरुवातीच्या काळात बरीच खासगी रुग्णालये आणि दवाखाने बंद होते. त्यामुळे खासगी डॉक्टरांनी आपले दवाखाने उघडले नाहीत तर त्यांच्यावर परवाना रद्द करण्याची कारवाई केली जाईल, असा इशारा नवी मुंबई पालिका आयुक्तांनी दिला होता. त्यानंतर याचिकाकर्तीच्या पतीने आपला दवाखाना सुरू करून रुग्णांवर उपचार करण्यास सुरुवात केली. त्यातच त्यांनाही करोनाची लागण झाली आणि जूनमध्ये त्यांचा मृत्यू झाला. याचिकाकर्तीने विमा कंपनीकडे प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेअंतर्गत ५० लाख रुपयांच्या विम्याच्या रकमेसाठी दावा केला. मात्र याचिकाकर्तीचे पती हे खासगी डॉक्टर होते सरकारी नाहीत, असे सांगत कंपनीने तिचा दावा फेटाळून लावला.

राज्य सरकारची बाजू..

याचिकेवरील सुनावणीच्या वेळी खासगी डॉक्टरांनाही या योजनेचा लाभ देण्याची मागणी करणारा प्रस्ताव केंद्रीय आरोग्य मंत्रालयाकडे पाठवण्यात आला आहे. मात्र केंद्र सरकारकडून अद्याप त्यावर काहीच प्रतिसाद देण्यात आलेला नाही, अशी माहिती राज्य सरकारतर्फे न्यायालयाला देण्यात आली. त्याची दखल घेत न्यायमूर्ती शाहरूख काथावाला आणि न्यायमूर्ती रियाज छागला यांच्या खंडपीठाने केंद्र सरकारला या प्रकरणी दोन आठवडय़ांत भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले.

# हिमालय पुलाची पुनर्बांधणी लवकरच

मुंबई : छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसच्या उपनगरी रेल्वे स्थानकालगतचा हिमालय पूल कोसळल्याच्या दुर्घटनेला पावणे दोन वर्षे पूर्ण होत आल्यानंतर अखेर या पुलाच्या पुनर्बांधणीसाठी पूल विभागाने निविदा मागवल्या आहेत. पूर्वीचा पूल गंजल्याचे सर्वेक्षणात आढळले होते. त्यामुळे या पुलासाठी स्टीलची तुळई (गर्डर) टाकण्यात येणार आहे. या पुलासाठी ६ कोटी ३८ लाखाचा खर्च अंदाजित आहे.

गेल्या वर्षी १४ मार्च २०१९ रोजी सायंकाळी गर्दीच्या वेळी हिमालय पुलाचा भाग भर रस्त्यात कोसळला. या दुर्घटनेत सहा जणांचे बळी गेले तर ३० जण जखमी झाले. या पुलाच्या दुर्घटनेमुळे पालिकेवर प्रचंड टीका झाली तसेच रेल्वे प्राधिकरणावरही आरोप झाले. या दुर्घटनेनंतर पूल विभागातील तीन अभियंत्यांना अटक करण्यात आली होती. घटनेचे गांभीर्य ओळखून मुंबईतील सर्वच पुलांचे नंतर सर्वेक्षणही करण्यात आले. मात्र हिमालय पुलाची पुनर्बांधणी कधी होणार याकडे सगळ्यांचे लक्ष लागले होते.

हिमालय पुलावरून रोज हजारो प्रवासी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसकडे लोकल पकडण्यासाठी जात असत. डी. एन. मार्गावर असलेला हिमालय पूल पडल्यानंतर पादचारी रस्ता ओलांडून जात होते. वाहनांची वर्दळ असलेल्या या रस्त्यावर पादचारी पूल बांधण्याची गरज होती. त्यामुळे पालिकेने निविदा मागवल्या आहेत.

या पुलासाठी स्टीलचा गर्डर बसवण्यात येणार आहे. पुलाचे काम पावसाळा धरून सव्वा वर्षांत पूर्ण करण्यात येणार आहे. काम करत असताना वाहनांच्या वर्दळीचे नियोजन वाहतूक पोलिसांच्या मार्गदर्शनाने करण्यात येणार असून पादचाऱ्यांसाठी मात्र हा रस्ता बंद करता येणार नाही, असे निविदेच्या अटी शर्तीमध्ये म्हटले आहे.

दक्षिण मुंबईत खाऱ्या हवेमुळे धातू गंजण्याचा धोका जास्त असतो. त्यामुळे या पुलाच्या अधिक मजबुतीसाठी स्टीलचे गर्डर वापरण्यात येणार आहेत. या पुलाला नेहमीप्रमाणे पायऱ्या असतील. हिमालय पुलाचे वेल्डिंग निघाल्यामुळे सहा बाय आठ फु टांचा भाग पडला होता. त्यामुळे आम्ही स्टीलचे प्लेट गर्डर लावणार आहोत, अशी माहिती पूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

## पृष्ठ १ वरुन

### मुंबई मेट्रोची कामे दजेर्दार आणि वेळेत

आर. ए. राजीव, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव आशिष कुमार सिंह तसेच मेट्रोशी निगडीत विविध विभागांचे वरीष्ठ अधिकारी उपस्थित होते. पाहणी दौऱ्यात मुख्यमंत्र्यांनी कामांच्या प्रगतीचा आढावा घेतला. तसेच विविध मुद्दयांबाबत निर्देश दिले. प्रकल्पातील चारकोप मेट्रो डेपोत मेट्रो मार्गिकांवरील चाचणीसाठी वापरण्यात येणाऱ्या मेट्रोच्या इंजिनचीही त्यांनी माहिती घेतली. दहिसर येथे उभारण्यात येत असलेल्या मेट्रोच्या पुलाच्या कामांचीही प्रत्यक्ष पाहणी केली. दरम्यान, उपस्थित अधिकाऱ्यांशी चर्चा करताना प्रकल्पातील प्रगतीपथावरील कामांबाबत मुख्यमंत्र्यांनी समाधान व्यक्त केले. ही कामे दर्जेदार व्हावीत, तसेच ती वेळेत पूर्ण करण्यात यावीत, या दृष्टीनेही मुख्यमंत्र्यांनी काही निर्देश दिले.

### सावळज येथे १३ लाख लंपास

आहे. याप्रकरणी डॉ. उर्पिला गजानन पाटील यांनी कल्पना दयानंद कांबळे (रा, सावळज) हिच्या विरोधात फिर्याद दिली आहे. डॉ. उर्मिला व त्याचे पती डॉक्टर आहेत. त्यांचे सावळज येथे रुग्णालय आहे. त्यांनी धर कामासाठी 2018 पासून कल्पना कांबळे हिला कामावर नेमले आहे. मार्च 2020 पर्यंत कोरोनामुळे त्यांनी 15 लाख रुपये त्यांनी बेडरूमधील कपाटात ठेवले होते. 4 नोव्हेंबर रोजी रूग्णालयात मशिन घेण्याचे ठरल्यानंतर त्यांनी रक्कम ठेवलेल्या ठिकाणी पाहिले असता रकमेत 13 लाख रुपये कमी असल्याचे दिसून आले. दरम्यान डाक्टर दाम्पत्याने कल्पना कांबळे हिच्याकडे चौकशी केली असता प्रारंभी उडवाउडवीची उत्तरे दिली. काही काळाने डाक्टर दाम्पत्याला कल्पना कांबळे ही मोठ्या प्रमाणात चैनी करीत असून तिने वाहन आणि अन्य वस्तू खरेदी केली असल्याची माहिती काही जणांकडून समजली. डाक्टर दाम्पत्याने तिला विचारले असता ती घाबरली. तिने माझ्याकडे असलेल्या रकमेपैकी चाळीस हजार रुपये देण्यास तयार आहे पण पोलिसात तक्रार करू नका असे म्हणू लागली. बाकीच्या रकमेबाबत तिने उडवाउडवीची उत्तरे दिल्याने तिच्या विरोधात तासगाव पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### निवृत्त पोलिस अधिकाऱ्याच्या मुलावर

मुलावर कोयत्याने वार करून हल्ला करण्यात आला. अमरिश बबनराव सणगर (वय 29) असे त्या तरुणाचे नाव आहे. किरकोळ कारणातून गुंड छोट्या बाबर टोळीतील पाचजणांनी हे कृत्य केले. शुक्रवारी रात्री ही घटना घडली. सर्व संशयितांना अटक करण्यात आली आहे. त्यांना न्यायालयात हजर केले असता चार दिवस पोलिस कोठडी मिळाली आहे. याप्रकरणी शनिवारी रात्री उशिरा शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मोट्या ऊर्फ मेघशाम अशोक जाधव (वय 28, रा. शामरावनगर), वैभव सदाशिव माळी (26), आकाश रामलाल सादवाणी (24), रोहित सुरेश कांबळे (24), हेमंत सुरेश इंगवले (26) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. अमरिश सणगर याने फिर्याद दिली आहे. सणगर हा निवृत्त पोलिस अधिकाऱ्याचा मुलगा आहे. काही दिवसांपूर्वी अमरिश आणि वैभव माळी यांच्यात वाद झाला होता. त्यातून त्यांच्यात धुसपूस सुरू होती. वाद झाल्यानंतर संशयित अमरिशकडे वारंवार रागाने पहात होते. शुक्रवारी रात्री पूर्वी झालेल्या वादाच्या रागातून संशयितांनी अमरिशला जाब विचारला. त्यानंतर संशयितांनी शिवीगाळ करत काठी आणि कोयत्याने हल्ला केला. त्यात अमरिश गंभीर जखमी झाला आहे. यावेळी संशयितांनी अमरिशचा मोबाईल काढून घेऊन फोडला. नंतर त्याच्या बुलेटवर दारूच्या बाटल्याही फोडण्यात आल्या. याप्रकरणी शनिवारी रात्री पाचजणांवर खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. शनिवारी रात्री उशीरा शहर पोलिस ठाण्याचे निरीक्षक अजय सिंदकर यांच्या मार्गदर्शनाने निलेश बागाव, विक्रम खोत, दिलीप जाधव यांच्या पथकाने चौघांनाही अटक केली. दोघे रेकॉर्डवरील गुन्हेगार सर्वच संशयित गुंड छोट्या बाबर टोळीतील आहेत. त्यातील मोट्या ऊर्फ मेघशाम जाधव, हेमंत इंगवले पोलिसांच्या रेकॉर्डवरील गुन्हेगार आहेत. मोट्यावर खुनाचा प्रयत्न, घरफोडी, मारामारी असे गुन्हे दाखल आहेत. त्याच्यावर मोकांतर्गतही कारवाई करण्यात आली आहे, तर इंगवलेवर मारामारीचा गुन्हा दाखल आहे.

### सीसीटीव्हीने टिपला वाहतूक पोलिस

झाशी राणी चौकात कर्तव्य बजावत होते. दुपारी ४ वाजताच्या सुमारास एक दुचाकीस्वार 'राँग साइड'ने आला. पवार यांनी त्याला थांबविले. सोडून देण्याची विनवणी दुचाकीस्वाराने पवार यांना केली. दुचाकीस्वाराचा मित्र पवार यांना आडोशाला घेऊन गेला. त्याच्या मागे दुचाकीस्वारही गेला. काही वेळाने दोघे परतले. दुचाकी घेऊन तेथून निघून गेले. याचवेळी आवाड हे कार्यालयातील 'स्क्रीन'वर सीसीटीव्ही फुटेज बघत होते. त्यांना हे दृश्य दिसले. आवाड यांनी प्रकरणाची शहानिशा करण्याचे निर्देश दिले. या वेळेत झाशी राणी चौकात कोणत्याही दुचाकीस्वाराला चालान देण्यात आले नसल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर आवाड यांनी या प्रकरणाची चौकशी वाहतूक शाखेच्या सदर झोनच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षकाकडे सोपविली. कर्तव्यात कसूर, संशयास्पद हालचाल केल्याचे प्राथमिक चौकशीत स्पष्ट झाले. वरिष्ठ पोलिस निरीक्षकाने आवाड यांच्याकडे अहवाल सादर केला. त्याआधारे आवाड यांनी पवार यांना निलंबित केले. या प्रकरणात तो दुचाकीस्वार दोषी आहे अथवा नाही, याचीही चौकशी करण्यात येत आहे. चौकशीनंतर त्याच्यावरही कारवाई करण्यात येईल.

### बनावट क्रीडा प्रमाणपत्र; एकास अटक

आला आहे. पोलिस निरिक्षक कृष्णा शिंदे यांनी तपास करत आहेत. या प्रकरणात आतापर्यंत दहा जणांना औरंगाबादसह बीड, परभणी तसेच विविध भागातून अटक केली आहे. आता आतीष हरी चव्हाण (वय ३०, रा. कांशीराम तांडा, ता. कंधार, जि. नांदेड ) याला अटक करण्यात आली आहे. त्याच्या ताब्यातून रग्बी, तलवारबाजी, नेटबॉल, कराटे या खेळांची प्रमाणपत्रे पोलिसांनी जप्त केली. त्याला नागपूर येथे न्यायालयात हजर केले असता २४ डिसेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे, अशी माहिती मानकापूर पोलिसांनी दिली. शहरातील जवाहरनगर पोलिस ठाण्यात १७८ जणांच्या विरोधात २४ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल करण्यापूर्वी क्रीडा विभागाच्या अधिकाऱ्यांनी पोलिस आयुक्त डॉ. निखील गुप्ता यांची भेट घेतल्याने हे प्रकरण गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आले आहे.

### पोलिस कर्मचाऱ्याने घेतला गळफास

कंटाळून हर्षल यांनी आत्महत्या केल्याची चर्चा पोलिस दलात आहे.
मिळालेल्या माहितीनुसार, हर्षल हे मूळ वरुड येथील रहिवासी होते. प्रसूतीमुळे त्यांच्या पत्नी सध्या कळमेश्वर येथे माहेरी आहेत. हर्षल कळमेश्वर येथून जाणे-येणे करायचे. शुक्रवारी ते कळमेश्वरला गेले नाहीत. शनिवारी दुपारी त्यांच्या पत्नीने हर्षल यांच्या मोबाइलवर संपर्क साधला. मात्र, तो झाला नाही. त्यानंतर हर्षल यांच्या पत्नीने शेजाऱ्याशी संपर्क साधला. हर्षल मोबाइलवर प्रतिसाद देत नसल्याचे सांगितले. शेजारी हर्षलच्या घरी गेला. मुख्य दार बंद होते. शेजारी मागील दारातून घरात गेला. हर्षल गळफास लावलेले त्याला दिसले. शेजाऱ्याने गिट्टीखदान पोलिसांना माहिती दिली. पोलिसांचा ताफा तेथे पोहोचला. पंचनामा करून पोलिसांनी मृतदेह मेयो हॉस्पिटलकडे रवाना केला. हर्षल यांनी आत्महत्येपूर्वी लिहिलेली चिठ्ठी पोलिसांनी जप्त केली. मात्र, यातील मजकूर सांगण्यास पोलिसांनी नकार दिला. गिट्टीखदान पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे.

# बोगस कॉल सेंटरचा 'असा' केला भंडाफोड; 16 महिलांसह 42 जणांना अटक



नवी दिल्ली: दिल्ली पोलिसांच्या सायबर गुन्हे शाखेने दिल्लीतील पिरागढी येथील एका बोगस कॉल सेंटरचा भंडाफोड केला. पोलिसांनी या प्रकरणात ४२ जणांना अटक केली आहे. त्यात १६ महिला आहेत. याशिवाय पोलिसांनी कॉल सेंटरमधून ९० इलेक्ट्रॉनिक उपकरणे जप्त केली आहेत. सायबर सेलच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी दिल्लीच्या पिरागढीमधून विदेशींना लक्ष्य करत होते. लॉ अँड एन्फोर्समेंट एजन्सी असल्याची बतावणी ते करत असत. मिळालेल्या माहितीनुसार, या आरोपींनी आतापर्यंत ३,५०० जणांना गंडा घातला आहे. त्यांची जवळपास ७० कोटींची फसवणूक केली आहे. हे सर्व आरोपी बऱ्याच काळापासून अशा प्रकारचे काम करत असावेत, असे त्यांच्याकडे सापडलेल्या इलेक्ट्रॉनिक उपकरणांवरून लक्षात येते, असेही अधिकाऱ्यांनी सांगितले. पीरागढीमध्ये एक बोगस कॉल सेंटर सुरू असल्याची माहिती मिळाली होती. पोलिसांनी तात्काळ धाड टाकली. घटनास्थळी मालक आणि इतर ४० हून अधिक लोक होते. त्यात १६ महिलादेखील होत्या.

पोलीस बातमी पत्र
महामुंबई
मुंबई, मंगळवार २२ ते २८ डिसेंबर-२०२०


संपादकीय...



# चिंता वाढतेय; मुलींचा जन्मदर घटतोय!


स्त्रियांना शिक्षणापासून नोकरी-रोजगारापर्यंत सर्वत्र जर समान संधी आहेत, राजकीय सत्तेत सहभाग वाढावा म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थांत आरक्षणही आहे, तर मग स्त्री-पुरुष समानता, समान हक्क, लिंगभेद, मुलींचा जन्मदर या शिळ्या विषयाच्या कढीला नव्यानं उत कशाला आणायचा, असे प्रश्न हल्ली समाजमाध्यमांवरील चर्चेतही सहज उपस्थित केले जातात. त्यांची सर्रास टवाळीही होते; पण देशातलं वास्तव तसं आहे का? एकीकडे हे खरंच आहे की, गेल्या काही वर्षांत भारताने जी प्रगती केली त्यात स्त्रियांना संधीची अनेक दालनं खुली झाली. स्त्रीवाद आणि पुरुषवादाच्या पलीकडे जाऊन 'मानवतावादी' समाज आणि समन्यायी संधी या दिशेने आपण देश म्हणून बरीच पाऊलं पुढे टाकली आहेत. मात्र, या प्रगतीला खीळ बसेल की काय, असं भय वाटावं अशी आकडेवारीही नुकतीच समोर आली आहे.राष्ट्रीय कुटुंब स्वास्थ्य सर्वेक्षण-५ (एनएफएचएस-५), २०१९-२० ची ताजी आकडेवारी सांगते की, देशातल्या आठ राज्यांत कमी झालेले लिंग गुणोत्तर हा काळजीचा विषय आहे. त्यामुळे लिंगभानासाठी म्हणून आजवर केलेल्या प्रयत्नांची गती मंदावली आहे. विशेषत: पुढारलेल्या म्हणवणाऱ्या काही राज्यांत मुलींचा जन्मदर कमी झाला आहे. त्यात गोवा, महाराष्ट्र, केरळ, हिमाचल प्रदेश, नागालँड या राज्यांचा क्रमांक पुढे आहे. त्या खालोखाल बिहार, मेघालय, दादरा नगर हवेली-दिऊ ही राज्ये आहेत. मुख्य म्हणजे देशातल्या ज्या प्रगत राज्यांमध्ये मुलींचं दरहजारी प्रमाण आधी जास्त होतं, तेच आता कमी झालं आहे. एकीकडे प्रगतीकडे वाटचाल सुरू असताना ही घट नेमकी कशाची निदर्शक आहे याचा विचार कुटुंब, समाज- ते राजकीय धोरण इच्छाशक्ती आणि अंमलबजावणी या सर्व टप्प्यांत होण्याची गरज आहे. उदाहरणार्थ केरळ आणि महाराष्ट्र या राज्यांत सरासरी शिक्षणाचं प्रमाण, लिंगभान जनजागृती उत्तम असताना मुलींचा जन्मदर घटण्याचे काय कारण असावे?२०१५ मध्ये केरळात मुलींचे दरहजारी प्रमाण १,०४७ होते, ते २०२० मध्ये ९५१ इतके झाले. तेच महाराष्ट्राचेही, जे प्रमाण हजारी ९२४ होते, ते आता ९१३ झाले आहे. गोव्यात २०१५ मध्ये ९६६ होते, ते ८३८ इतके कमी झालेले दिसते. याउलट ज्या राज्यांमध्ये मुलींचा जन्म हाच अभिशाप मानला जात होता त्या पंजाब आणि हरयाणा या राज्यांनी मात्र उत्तम प्रगती केली आहे. तिथं मुलींचा जन्मदर वाढला आहे. पंजाबमध्ये हजारी ७३४ इतके कमी असलेले प्रमाण ८६० पर्यंत, तर हरयाणामध्ये ७६२ हून ८३६ पर्यंत पोहोचले आहे. हे प्रमाण आजही बरेच कमी असले तरी गेल्या पाच वर्षांत या राज्यांनी केलेली प्रगती हेच सांगते की जनजागृती आणि कायदे जर हातात हात घालून काम करू लागले, तर सामाजिक बदलांना उत्तम गती लाभते. महाराष्ट्रातही हेच चित्र दिसतं. पश्चिम महाराष्ट्रात दरहजारी मुलींचा जन्मदर मोठी प्रगती दर्शवितो. कोल्हापूर (६५१ ते ९३७) सांगली (९१३ ते १,०१२) सोलापूर (८१५ ते ९६०) यासह धुळे, लातूर, रायगड, सिंधुदुर्ग, उस्मानाबाद या जिल्ह्यांच्या आकडेवारीतही लक्षणीय प्रगती आहे. त्याउलट पुणे, नाशिक, औरंगाबाद या प्रगत म्हणवणाऱ्या जिल्ह्यांत मुलींचा जन्मदर खालावला आहे. बीड, जालना, हिंगोली या मराठवाड्यातील जिल्ह्यांत तर तो अधिकच कमी झालेला आहे.मुलींचा जन्मदर कमी असणं, असलेला अधिक कमी होणं हे जास्त चिंतेचं आहे. एकीकडे या आकडेवारीलाही काही मर्यादा आहेत, कारण लॉकडाऊनपूर्वी हे सर्वेक्षण झाले आहे. मात्र तरीही त्यातून समोर आलेलं हे चित्र चिंताजनकच आहे. एकीकडे ग्रामीण भागात अजूनही मुलगा हवाच हा आग्रह आणि दुसरीकडे शहरी भागात एकच मूल जन्माला घालण्याचं पालकांचं धोरणही मुलींचे दरहजारी प्रमाण कमी होण्यास कारणीभूत आहे का, याचा सामाजिक अभ्यासही होणं गरजेचं आहे. खासगी नोकऱ्या, त्यातली अशाश्वतता, अस्थैर्य, मुलांच्या उत्तम शिक्षणासाठी वाढता खर्च हे सारं पाहता पालक एकच अपत्य धोरण स्वीकारू लागलेत. बदलत्या कौटुंबिक गरजा आणि प्रश्न यांची गुंतागुंत मोठी आहे. नव्या कुटुंबांचा सामाजिक स्तरावर अभ्यास आणि त्यासाठीची आधारव्यवस्था निर्मिती हे आपल्या समाजासमोरचं मोठं आव्हान आहे. शहरी भागात विभक्त कुटुंबाचे प्रश्न वेगळे आहेत, आवश्यक आधार व्यवस्थांची उणीव आहे. या साऱ्या प्रश्नांची उत्तरं शोधली नाहीत तर स्त्रियांना समानसंधी उपलब्ध आहेत असं चित्र वरकरणी उभं राहिलं तरी त्या संधींपर्यंत पोहोचणं स्त्रियांना दिवसेंदिवस अवघड होत जाईल.

# इतिहासाची 'भरपाई'

## न्यायालये कायद्याचा अर्थ लावताना वा कायद्याचे नवे दंडक स्थापित करताना पूर्वसंगतीचे तत्त्व कसोशीने पाळतात, पण इतिहासाची वाटचाल केवळ पूर्वसंगतीवर होत नाही..

'गुन्ह्याला शिक्षा' हाच न्याय इतिहासातील चुकांना लावण्याचे आकर्षण लोकांना असेल, पण इतिहासातील चुकांमागची गृहीतके तपासावी लागणारच..

सारासार निर्णय घेण्याची क्षमता किंवा विवेक ही मानवी क्षमता असली, तरी न्यायालयांचे स्थान त्याहून मोठेच. कारण न्यायालये कायद्याच्या संहितेचा किंवा राज्यघटनेच्या अनुच्छेदांचा योग्य अर्थ काढण्याचे काम करीत असतात. सोपे नसते हे काम. त्यातही देशोदेशींच्या सर्वोच्च न्यायालयांचे काम तर फार अवघड. हे न्यायालय जो निर्णय देईल, तो त्या देशाचा कायदा ठरतो. म्हणजे देशातल्या कायद्यांमध्ये सुसंगती राखण्याची जबाबदारी सर्वोच्च न्यायालयांची असते. ही सुसंगती मूल्यांची आणि न्यायतत्त्वांची असते, तसेच अनेकदा ती निव्वळ तांत्रिक तरतुदींचीही असू शकते. म्हणजे उदाहरणार्थ, एखाद्या प्रकल्पाला आधी पर्यावरणीय मंजुरी हवी, वनखात्याचीही मंजुरी हवी, असा दंडक न्यायालयाच्या निकालांमुळेच लागू झालेला असल्याचे कारण देऊन चेन्नई ते सेलम या प्रशस्त महामार्गासाठी सरकारने भूसंपादन करणारे बेकायदा ठरवणारा निकाल मद्रास उच्च न्यायालयाने दिला, तो ८ डिसेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयाने रद्द ठरवला. पण म्हणून वन/पर्यावरण आदी मंजुरी नकोच असा काही नवाच दंडक लागू झाला का? अर्थातच नाही.. जुन्या दंडकांमधून या प्रकरणाला सूट मिळू शकते की नाही, एवढा तांत्रिक मुद्दा त्या प्रकरणात होता. हे उदाहरण देण्यामागे हेतू हा की, देशाच्या न्यायपालिकने नवे दंडक जरूर घालून द्यावेत किंवा जुने दंडक जरूर मोडीत काढावेत, त्यामुळे नवे कायदेही प्रस्थापित व्हावेत, पण या साऱ्यात काहीएक सुसंगतीची अपेक्षा असतेच आणि बहुतेक वेळा न्यायालये अपेक्षाभंग करीत नाहीत, उलट सुसंगती किंवा 'पूर्वसंगती' कायम राखतात, हे स्पष्ट व्हावे. पूर्वसंगतीचे हे माहात्म्य आताच नोंदवण्याचे कारण मात्र अगदीच निराळे. ते असे की, १९७५ सालची घोषित आणीबाणी ही 'घटनाबा' ठरवावी, अशी मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने दाखल करून घेतली असून, या कथित घटनाबा कृत्यात सहभागी होऊन ज्यांनी याचिकादाराला त्रास दिला, त्या सर्व यंत्रणांकडून याचिकादाराला २५ कोटी रुपयांची भरपाईसुद्धा ही याचिका मागते!



ब्रिटनमध्ये 'क्वीन्स काउन्सेल' म्हणूनही वकिली करणारे आणि अनेकदा आंतरराष्ट्रीय स्तरावर भारत सरकारची बाजू मांडणारे वरिष्ठ वकील हरीश साळवे यांनी या याचिकेच्या बाजूने मत नोंदवल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने ती दाखल करून घेतलेली आहे. यावर केंद्र सरकारने म्हणणे मांडावे, अशी नोटीसही सर्वोच्च न्यायालयाने बजावल्यामुळे, १४ डिसेंबरपासून हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे आणि अर्थातच, त्याचा निकाल काय लागेल वा काय लागावा, याची चर्चा कुणीही न करणे इष्ट. विशेषत: त्या याचिकेतील मागणीनुसार २५ कोटी रुपये मिळतील का, मिळाले तर कुणाकडून मिळतील, ही चर्चा आज अयोग्य तर ठरतेच; पण याचिका दाखल व्हावी म्हणून युक्तिवाद करणारे साळवे यांनीही भरपाईचा किंवा अन्याय कुणावर झाला याचा मुद्दा महत्त्वाचा नाही, असे स्पष्ट म्हटलेले आहे. त्यानुसार याचिकेत बदल करण्याच्या बोलीवरच तर ही याचिका न्यायप्रविष्ट झाली आहे. म्हणजे मुद्दा २५ कोटींचा नाही. मग कुठला? तर तो आहे इतिहासात चूक झाली आहे हे मान्य करण्याचा. ही मान्यता द्यावी की देऊ नये, हे सर्वोच्च न्यायालय ठरवणार. प्रकरण न्यायप्रविष्ट आहे, तोवर काही मतप्रदर्शन अनुचितच ठरणार.

पण इतिहासातील, गतकाळातील चुकांची आणि त्यांच्या परिणामांची चर्चा तर न्यायालयाबाहेरही होतच असते. विद्यापीठीय इतिहासकारच नव्हे, तर आता हौशी किंवा बिगरविद्यापीठीय इतिहासकारही याविषयी अधिकारवाणीने काही विधाने करीत असतात. म्हणूनच तर २०१५ च्या मे महिन्यात ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या वादविवाद मंडळात, ब्रिटनने भारतास वसाहतकाळातील ऐतिहासिक चुकांबद्दल भरपाई द्यावी की नाही, यावर चर्चा रंगली. 'प्रश्न भरपाईच्या रकमेचा नाही.. भरपाई कुणाला मिळणार याचाही नाही. भरपाई देणे लागतो हे तरी ब्रिटनने तत्त्वत: मान्य करावे. चूक झाली, याची कबुली द्यावी' अशा विधानांनी ती चर्चा संपविणाऱ्या शशी थरूर यांचे ते भाषण प्रचंड गाजले. इतके की, किमान ७० लाख जणांनी यूट्यूब आदी माध्यमांद्वारे ते स्वमर्जीने पाहिले. ब्रिटिश येण्यापूर्वी जागतिक व्यापारात भारताचा वाटा २७ टक्के होता, तो १९४७ मध्ये दोन टक्क्यांपर्यंत खाली आला, वगैरे उदाहरणांची बरसात करीत थरूर यांनी त्या चर्चेत बहार उडवून दिली होती. या भाषणाची प्रशंसा करून नरेंद्र मोदी यांनी, विरोधकांबद्दल आपण बरेही बोलू शकतो हे सिद्ध केले होते. त्या चर्चेने वा थरूरांच्या भाषणाने प्रत्यक्षात काही फरक पडला नाही तो नाहीच. पण इथे महत्त्वाचे हे की, लोकांना भरपाई वगैरेंच्या चर्चा भारीच आवडतात आणि प्रशंसनीय वाटतात, हे जगजाहीर झाले. इतिहासात काही तरी भलीमोठी चूक झालेली होती आणि ती दुरुस्त करण्याची प्रत्यक्ष संधी आत्ता आहे, असा संदेश भरपाईच्या मागणीतून मिळतो हेसुद्धा लोकांना आवडत असावे. किंबहुना इतिहासातली चूक आणि तिची दुरुस्ती हे जणू पालुपदच असल्यासारखे आळवता येते आणि वर्तमान कार्यभाग साधता येतो, हे थरूर यांच्याआधीच अनेकांना कळले, असे मानण्यास जागा आहे. हैदराबादसारख्या एखाद्या महानगरपालिकेत आपल्या पक्षाचे नगरसेवक निवडून आल्यास 'निजामाची संस्कृती संपवू' अशी गर्जना केली जाते ती इतिहासात काही चूक झालेली आहे, आणि आपण ती दुरुस्त करू, याच भावनेतून. तिबेट चीनने गिळंकृत केला ही जवाहरलाल नेहरूंची चूक, राजकारणात दिसणारी घराणेशाही ही मोतीलाल नेहरूंची चूक, बॅ. जिना फाळणीच्याच मागणीवर ठाम राहिले ही गांधीजींची चूक, असे अगदी ठामपणे मानणाऱ्यांची दुसरी किंवा तिसरी पिढीही आता प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे राजकारणात आली आहे. गांधीजींची हत्या केली म्हणून ज्याला माथेफिरू मानले जात होते त्याला आता हुतात्मा वगैरे म्हणणे, त्याच्या प्रतिमेचे पूजन करणे, असले प्रकार आज करणारे लोक हे कुठली तरी ऐतिहासिक चूक दुरुस्त करण्याच्या आविर्भावातच नसतात काय?

तेव्हा मुद्दा इतिहासातल्या चुका दुरुस्त करण्याबद्दल असलेल्या आकर्षणाचा आहे आणि तो न्यायालयाच्याच नव्हे तर कायद्याच्याही तर्काबाहेरचा आहे. गुन्हेगारी कायद्यात 'मनुष्यहत्या करणाऱ्यास जन्मठेप वा फाशी' इथपासून ते भुरट्या चोरीबद्दलच्या शिक्षा नमूद असतात. अशा शिक्षा म्हणजे चुकीच्या वर्तनाचे परिमार्जन किंवा भरपाई, असे मानले जाते. इतिहासातल्या चुकांचे परिमार्जन करण्याचा मार्ग मात्र यापेक्षा नक्कीच निराळा असतो आणि असायला हवा.

इतिहासात चुका होण्यामागे जी गृहीतके होती ती चुकीची होती का, हे तपासण्याचा तो मार्ग. गृहीतके मुळात चुकीची नसतीलही. उदा.- अमेरिकेने 'स्वदेशहित' हे गृहीतक धरून व्हिएतनाम युद्ध केले.. पण अंमलबजावणीचे मार्ग चुकीचे होते की नाही, हे पाहावे लागणार. नाही तर परवा व्हिएतनाम, काल अफगाणिस्तान, असा मारच खावा लागणार. वसाहतकाळात ब्रिटनने ज्या एकांडेगिरीचे गृहीतक मांडून अन्य युरोपीय देशांपेक्षा अधिक साम्राज्यविस्तार केला, तोच ब्रिटन आता ब्रेग्झिटमार्गे एकांडेगिरी करणार असेल तर बदल कोठे झाला? आणीबाणीची भरपाई मागणाऱ्या याचिकेचे न्यायालय काय करील ते करील. पण जोवर त्या आणीबाणीची आठवण देणारे वर्तन राज्यकर्त्यांकडून होते आहे, तोवर 'इतिहासातील चुकीची भरपाई झाली' असे कसे काय म्हणता येईल? खरी भरपाई होण्यासाठी विवेकच वापरावा लागेल, याचिका नव्हे.

# चटईक्षेत्रफळ वितरणात म्हाडा वसाहतींवर पुन्हा अन्याय!



मुंबई : जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास मार्गी लागावा, यासाठी राज्य सरकारने प्रोत्साहनात्मक चटईक्षेत्रफळाचे वितरण करताना तो लाभ जुन्या व मोडकळीस आलेल्या म्हाडा वसाहतींना लागू करण्यात आला नसल्याची बाब उघड झाली आहे. म्हाडाच्या माजी उपाध्यक्षांनी ही बाब पत्राद्वारे लक्षात आणल्यानंतरही त्याकडे शासनाने दुर्लक्षच केले आहे.

म्हाडाच्या ५६ इमारती आणि १०४ अभिन्यास आहेत. त्या ५० वर्षांपेक्षा अधिक जुन्या असून त्यांचा पुनर्विकास आवश्यक आहे. मात्र आवश्यक चटईक्षेत्रफळ धोरणाबाबत शासनाने विलंबाचे धोरण अवलंबिले. अखेरीस भाजप सरकारने धोरण जाहीर केले असले तरी या धोरणाचा नीट अभ्यास केल्यास म्हाडा वसाहतींचा पुनर्विकास करणाऱ्या विकासकाला एका चौरस फुटामागे फक्त पॉईंट सहा इतकेच चटईक्षेत्रफळ खुल्या विक्रीसाठी मिळत असल्याची बाब स्पष्ट झाली आहे. त्याचवेळी झोपडपट्टी पुनर्विकासासाठी असलेल्या ३३ (१०) या नियमावलीत विकासकाला प्रत्येक एक चौरस फुटामागे १.३ चौरस फुट इतके चटईक्षेत्रफळ खुल्या विक्रीसाठी उपलब्ध होत आहे.


जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाठी असलेल्या ३३ (७) आणि ३३ (९) म्हणजे समूह पुनर्विकासात प्रत्येक एक चौरस फुटामागे १.२ चौरस फूट चटईक्षेत्रफळ खुल्या विक्रीसाठी मिळणार असल्यामुळे या योजनांसाठी विकासक अधिक इच्छूक आहेत. मात्र म्हाडा पुनर्विकासासाठीच्चा ३३(५) या नियमावलीत एक चौरस फुटामागे फक्त ००.६ इतकेच चटईक्षेत्रफळ विक्रीसाठी असल्यामुळे विकासक कसा रस घेतील, असा प्रश्न आहे. या विरोधाभासाबाबत २५ ऑक्टोबर २०१८ रोजी तत्कालीन म्हाडा उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी मिलिंद म्हैसकर यांनी नगरविकास विभागाचे तत्कालीन प्रधान सचिव नितीन करीर यांना पत्र लिहिले होते. त्यात जुन्या इमारतींसाठी असलेल्या तरतुदी म्हाडा वसाहतींनाही लागू कराव्यात अशी मागणी केली होती. शिवसेना आमदार अजय चौधरी यांनी आता मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना पत्र देऊन या मागणीचा पुनरुच्चार केला आहे.

विकास नियंत्रण नियमावलीत सर्वांना समान चटईक्षेत्रफळ मिळाले पाहिजे. जुन्या इमारतींसह म्हाडा वसाहतींचाही पुनर्विकास व्हावा, अशीच शासनाची भूमिका आहे. अडचणींबाबत नगरविकास विभागाकडे पाठपुरावा केला जाईल.

— जितेंद्र आव्हाड, गृहनिर्माण मंत्री.

# राज्य राखीव दलाच्या मदतीने गोवंडीत पोलिसांची शोधमोहीम

## 127 गुन्हेगारांची झाडाझडती, पाच जणांना अटक



गोवंडी येथील शिवाजीनगर परिसरात बुधवारी संध्याकाळी राज्य राखीव पोलीस दलाच्या (एसआरपीएफ) तीन तुकड्यांसह सुमारे दोनशे पोलिसांनी शोध मोहीम राबविली. या कारवाईत परिसरातील १२७ सराईत गुन्हेगारांची झाडाझडती घेण्यात आली. तसेच अमलीपदार्थ, अवैधरीत्या मद्य विकणाऱ्या दोन महिलांसह मुंबईतून हद्दपार करण्यात आलेले आरोपी, विविध गुन्ह्यांत शोध सुरू असलेल्या दोघांना अटक करण्यात आली.

परिमंडळ सहाचे उपायुक्त कृष्णकांत उपाध्याय यांच्या मार्गदर्शनाखाली केलेल्या या कारवाईत एसआरपीएफच्या तीन तुकड्यांसह १० वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सहा पोलीस ठाण्यांमधील गुन्हे प्रकटीकरण पथके , दहशतवादविरोधी कक्षाचे अधिकारी असे सुमारे दोनशे पोलीस सहभागी झाले होते.

भविष्यात घडणाऱ्या गुन्ह्यांना प्रतिबंध, गुन्हा करून अटक टाळण्यासाठी दडून बसलेल्या आरोपींना अटक आणि अटकेनंतर केलेल्या प्रतिबंधक कारवायांना न जुमानणाऱ्या सराईत गुन्हेगारांना चाप लावणे ही त्रिसूत्री या कारवाईमागे असल्याचे उपाध्याय यांनी ' सांगितले.

याआधी ट्रॉम्बे पोलीस ठाण्याच्या हद्दीत अशाप्रकारे प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली होती. परिमंडळ सहाअंतर्गत येणाऱ्या आणि सराईत गुन्हेगारांचे अड्डे किंवा केंद्र बनलेल्या वस्त्यांमध्ये अशी कारवाई वारंवार केली जाईल. या कारवाईदरम्यान अवैध व्यवसायांवरही टाच आणली जाईल, असे उपाध्याय यांनी सांगितले. याआधी उपाध्याय आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मानखुर्द, ट्रॉम्बे परिसरातील तीन संघटित टोळ्या मोक्कान्वये (महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक कायदा) गजाआड केल्या आहेत.

# कोरोनाकाळात बेस्टच्या वीज चोरीच्या प्रकरणांत घट



कोरोना काळात बेस्टची वीज चोरी करणे, मीटरमध्ये फेरफार करणे किंवा थेट जोडणी करुन फुकटात वीज घेणे अशा वीज चोरी करणाऱ्यांना आळा घालण्यासाठी बेस्टकडून युध्दपातळीवर जनजागृती आणि कारवाई मोहीम हाती घेतली होती. त्यामुळे यंदा वीज चोरी करणाऱ्यांमध्ये मोठा प्रमाणात घट झाली आहे. गेल्या वर्षी 1 हजार 394 वीजचोरी प्रकरणे सापडली होती. यंदा मात्र वीज चोरीची ७२२ प्रकरणे सापडली आहेत. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा 50 टक्के वीज चोरीच्या घटना कमी झालेल्या आहेत. बेस्टच्या मोहिमेला यश बेस्ट उपक्रमाकडून मुंबईत वीज पुरवठा केला जातो. मात्र गेल्या काही वर्षांपासून वीज चोरीच्या घटना वाढत होत्या. त्यामुळे बेस्टला दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा फटका बसत होता. बेस्टने वीज चोरीच्या घटनेत आळा घालण्यासाठी तसेच आर्थिक अडचणीत असलेल्या बेस्ट उपक्रमाला सावरण्यासाठी बेस्टच्या विद्युत विभागाने युध्दपातळीवर जनजागृती केली. सोबतच बेस्टच्या विद्युत विभागातील दक्षता अधिकाऱ्यांनी कारवाई मोहीम हाती घेतली होती. त्यामुळे बेस्टच्या वीज चोरीच्या घटनांमध्ये कमतरत आलेली आहेत. कोरोना काळातसुध्दा बेस्टकडून वीज चोरी करणाऱ्यांवर कारवाई केली आहे. गेल्या वर्षी जानेवारी ते डिसेंबरमध्ये मीटरमध्ये फेरफार करण्याचे 234 प्रकरण सापडले होते. तर यंदा त्यांची संख्या 64 वर आली आहे. तर थेट जोडणी करुन फुकटात वीज घेण्याचे प्रकरण गेल्या वर्षी 759 प्रकरण सापडले होते. तर यंदा ती संख्या 511 वर आली आहे. इतकेच नव्हेतर सर्व प्रकारचा वीज चोरीच्या घटनेतील कमतरता आल्याने बेस्टच्या महसुलातसुध्दा वाढ झाली आहे.

# पोलीस बातमी पत्र

संमिश्र

४

मुंबई, मंगळवार २२ ते २८ डिसेंबर-२०२०


# करोना महामारीत डब्बेवाल्यांचे आश्रय दाते मेकिंग दी डिफरेंस एनजीओ





या ट्रस्ट द्वारे 2000 डब्बेवल्याना सतत 6 वेळा जीवनावश्यक वस्तूचे वाटप मोट्या प्रमाणात मीरा भाईंदर येते करण्यात आले या वेळी हातावर पोट असणाऱ्या या डब्बे वाल्यांसाठी करोना च्या महामारीत अतोनात हाल झाले अश्यावेळी जवळ जवळ 9 महिन्यात 6 वेळा याना सर्वांना जीवना आवश्यक धान्य तेल साखर गूळ डाळ असे कुटुंबाला 2 महिने पुरेल इतके धान्य वाटप मेकिंग द दिफ्रान्स या संस्थेच्या वतीने वाटप करण्यात आहे अतिशय आगळा वेगळा कार्यक्रम मीरा भाईंदर येथे पार पडला या वेळी पूर्व विधायक नरेंद्र मेहता, उप महापौर हसमुख गहलोत, पूर्व महापौर डिंपल मेहता, सभागृह नेता प्रशांत दलवी, नगरसेवक अरविन्द शेट्टी, समाजसेवी एजाज़ खतीब, समाजसेवी इब्राहिम सत्तार, समाजसेवी मॉरिस नरोन्हा, मनपा वार्ताहर संघ के संस्थापक अध्यक्ष राजेंद्र कांबले, मनपा वार्ताहर संघ के अध्यक्ष राजदेव तिवारी, वरिष्ठ पत्रकार मिलिंद लिमय, पोलीस बातमी पत्र चे संपादक दीपक मोरेश्वर नाईक,वरिष्ठ पत्रकार सूरजप्रेक्ष सांडेसर, वरिष्ठ पत्रकार सुभाष पांडेय, वरिष्ठ पत्रकार वसंत माने, TV9 के रमेश शर्मा, YSR News के अज़ीम ताम्बोली, दबंग खबरे चे शशि शर्मा, लक्ष्याधारी के रविंद्र उपाध्याय, HMTV के विनय महाजन, आपका समय के अनिल नौटियाल, Lokhit News के सय्यद मोईन, मुंबई तरंग चे संपादक दिलीप पटेल, पुण्यनगरी के नामदेव काशिद , जनकल्याण सेवा की सिमा गुप्ता, पत्रकार इस्लाम कुरैशी व अनेक मान्यवर उपस्थित होते.

## शरीरास घातक अशा पदार्थांची विक्री करणाऱ्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेने केले जेरबंद



पालघर (पूर्व) येथील पोलीस ठाणे हद्दीत असलेल्या वरखूंटी रोडवरील आनंदी बस स्टॉपच्या जानबाई यांची नवीन बनत असलेल्या बिल्डिंगच्या दुकानांमध्ये आरोपी नामे. ब्रिजेश राजेंद्र शाहू (वय-४०) राहायला कुंती नगर, नवली वरखंडे रोड, पालघर (पूर्व) तालुका.जिल्हा. पालघर महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित करण्यात आलेल्या तंबाखूजन्य पदार्थ गुटखा (सुगंधित सुपारी व पानमसाला) विक्री करण्यासाठी स्वतः जवळ ठेवला होता. सदरची घटना दिनांक.१९/१२/२०२० रोजी ३:३० वाजताच्या सुमारास घडली आरोपी ब्रिजेश शाहू यांच्या ताब्यातून तब्बल

१) ९,८४९/- रुपये किंमतीचे ६७ पॅकेट २) ५,२५०/- रुपये किंमतीचे १५० पॅकेट ३) २३,१००/- रुपये किंमतीचे

१६५ पॅकेट ४) ४,२२१/- रुपये किंमतीचे ६७ पॅकेट ५) ९,८४०/- रुपये किंमतीचे ८२ पॅकेट ६) २,७७२/- रुपये किंमतीचे १४ पॅकेट ७) २,०८०/- रुपये किंमतीचे १३ पॅकेट ८) १८,०००/- रुपये किंमतीचे १५० पॅकेट ९) ४,५००/- रुपये किंमतीचे १५० पॅकेट १०)१,२६०/- रुपये किंमतीचे १८ पॅकेट ११) ३,०८०/- रुपये किंमतीचे ७० पॅकेट १२) १,६२०/- रुपये किंमतीचे ५४ पॅकेट असा एकूण ८५,५७२/-रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर आरोपीविरुद्ध पालघर पोलीस ठाणे गुन्हे रजि क्र. ३११/२०२० भा.द.वि.स.क. -१८८, २६९,२७० अन्न सुरक्षा अधिनियम मानक अधिनियम २००६ कलम -०६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

सदरची कामगीरी पोलीस निरीक्षक श्री. रविंद्र नाईक प्रभारी अधिकारी स्थानिक गुन्हे शाखा पालघर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा पालघरचे पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी यांनी केली

## चार वर्षीय मुलीचे अपहरण करून लैंगिक अत्याचार करणाऱ्या आरोपीला भाईंदर पोलीसांनी केली तात्काळ कारवाई

दिनांक. २०/१२/२०२० रोजी दुपारी १:००वाजताच्या सुमारास फिर्यादी महिला राहायला भोलानगर झोपडपट्टी, भाईंदर (पश्चिम) यांची चार वर्षाची मुलगी त्यांच्या घरासमोर उभ्या लक्झरी बस मध्ये लहान मुलां सोबत खेळत होती. त्यानंतर बस तेथून निघून गेली तेव्हा सर्व मुले खाली उतरले परंतु फिर्यादीची मुलगी बस मध्ये राहिली असल्याचे मुलांनी सांगितले. त्याप्रमाणे मुलीचा नमूद बसमध्ये शोध घेण्यात आला परंतु मुलगी मिळुन आली नाही. म्हणून फिर्यादीच्या तक्रारीवरून बस चालका विरुद्ध भाईंदर पोलीस ठाणे येथे गुन्हा रोजी नं. ७१७/२०२० भा.द.वि.स.कलम ३६३ अन्वये दाखल करण्यात आला.सदर घटनेची माहिती भाईंदर पोलीस ठाण्यात मिळताच पोलीस उप निरीक्षक किरण दळवी व पथकाने आरोपी बस चालक (वय-३४) राहायला सांताक्रुज (पश्चिम) मुंबई, याची माहिती प्राप्त करून त्यास वसई-माणिकपुर येथून ताब्यात घेऊन वरिष्ठांच्या मार्गदर्शनाने चौकशी केली असता आरोपीने फिर्यादीची चार वर्षीय अल्पवयीन मुलीवर बस मध्ये लैंगिक अत्याचार करून तिचा गळा आवळून जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने प्लास्टिक गोणीत भरून वालीव पोलीस ठाण्याच्या हद्दीत रस्त्याकडे टाकून दिले असल्याचे निष्पन्न झाले. त्यावरून लगेच पोलीस पथकाने वालीव पोलीस ठाण्याकडे तपास



केला व वालीव पोलीस ठाणे हद्दीत फिर्यादीची पीडित मुलगी जखमी अवस्थेत मिळून आली. तिच्यावर प्राथमिक उपचार करून तिला पुढील उपचारासाठी मुंबई येथील हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे.सदर गुन्ह्यात भा.द.वि.कलम ३७६(२)(आय),३७६(३),३०७, २०१ सह बालकांचे लैंगिक अत्याचार प्रतिबंधक अधिनियम कलम ४,८,१२ समाविष्ट करून आरोपीला सदर गुन्ह्यात अटक करण्यात आली असून आरोपीची माननीय न्यायालयीन दिनांक.२८/१२/२०२० रोजी पावेतो पोलीस कोठडी रिमांड मंजूर केली असून गुन्ह्याचा पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक मनीषा पाटील ह्या करीत आहेत.सदरची कामगिरी श्री.संजय कुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, (अति कार्यभार) मिरा-भाईंदर, डॉ.शशिकांत भोसले, सहाय्यक पोलीस आयुक्त, भाईंदर विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक चंद्रकांत जाधव, पोलीस ठाणे भाईंदर, पोलीस निरीक्षक वनकोटी गुन्हे शाखा (मीरा-भाईंदर), पोलीस निरीक्षक वडाख, गुन्हे शाखा (वसई) पोलीस ठाणे भाईंदर पोलीस उपनिरीक्षक किरण दळवी, पोलीस उप निरीक्षक मनीषा पाटील व तपास पथक यांनी केली.

## १ कोटींचे चरस जप्त; दिल्लीहून रेल्वेने आणले होते महाराष्ट्रात

पुणे: लोहमार्ग पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. अंदाजे १ कोटी रुपये किंमतीचा चरस पकडले असून, दोघांना अटक केली आहे. नववर्षाच्या पार्श्वभूमीवर दिल्लीहून रेल्वेतून महाराष्ट्रात आणण्यात आले होता. पुण्यासह इतर शहरांत त्याची विक्री केली जाणार होती. मिळालेल्या माहितीनुसार, पोलिसांनी १ कोटी ३ लाख रुपये किंमतीचा चरस जप्त केले आहे. नववर्षाच्या पार्श्वभूमीवर पुण्यासह इतर शहरांत त्याची विक्री केली जाणार होती. या प्रकरणी दोघांना अटक केली आहे. ललित कुमार दयानंद शर्मा (वय ४९) आणि कौलसिंग रूपसिंग (वय ४०) अशी त्यांची नावे आहेत. ते हिमाचल प्रदेशातील आहेत. मुंबई, पुणे, गोवा आणि बेंगळुरू येथे त्याची विक्री केली जाणार होती.

## बेकायदेशीर दारु वाहतूक करणाऱ्या आरोपीला जव्हार पोलीस ठाण्याने केले गजाआड




जव्हार पोलीस ठाणे हद्दीत खंबाळा दूरक्षेत्र चौकी, तालुका.जव्हार, जिल्हा पालघर येथे आरोपी नामे. दिपक दिनकर भोगे (वय-२९) राहायला नाशिक यांनी त्यांच्या ताब्यातील मारुती सुझुकी कंपनीची सफेद रंगाची स्विफ्ट डिझायर गाडी यातून अवैधरीत्या विनापरवाना प्रोव्हिशन गुन्ह्याचा माल स्वतः जवळ बाळगून विक्री करण्यासाठी जात असताना मिळून आला.सदर आरोपीच्या ताब्यातून १) २,०००००/- रुपये किंमतीची एक चारचाकी मारुती सुझुकी कंपनीची सफेद रंगाची स्विफ्ट डिझायर गाडी २) ६,२४०/- किमतीचे मॅकडॉल कंपनीचे १८० मिली मापाच्या ९६ सीलबंद बाटल्या ३) ३,३६०/-रुपये किमतीच्या स्टॉलींग कंपनीचे ७५० मिली मापाच्या एकूण १२ सीलबंद बाटल्या ४) ६,०७२ /- रुपये किंमतीच्या मॅकन्टा ॅस कंपनीचे ७५० मिली मापाच्या एकूण १२ सीलबंद बाटल्या ५) ३,३६०/- रुपये किंमतीचा रॉयल स्टॅग कंपनीचे ७५० मिली मापाच्या एकूण १२ सीलबंद बाटल्या असा एकूण २,१९,०३२ रुपये किंमतीचा मुद्देमाल दिनांक. १९/१२/२०२० रोजी ७:४५ वाजता सुमारात करण्यात आला.सदर आरोपी विरोधात जव्हार पोलीस ठाणे गुन्हा रोजी क्र. १८९/२०२० महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५(अ) प्रमाणे गुन्हा दाखल केला असून पुढील तपास चालू आहे.सदरची कामगिरी पोलीस निरीक्षक अप्पासाहेब लेंगर प्रभारी अधिकारी जव्हार पोलीस ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली जव्हार पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी यांनी केली.

## 22 डिसेंबर 2020 ते 5 जानेवारी 2020 पर्यंत राज्यात 15 दिवस रात्री संचारबंदी

### पुढील १५ दिवस अधिक सतर्क रहावे लागेल – मुख्यमंत्री उद्धव ठाकरे



मुंबई प्रतिनिधी : ब्रिटनमध्ये कोरोना विषाणूचा नवा प्रकार आढळून आल्याच्या पार्श्वभूमीवर आज मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी खबरदारीच्या उपाययोजनांसाठी बैठक घेतली. राज्यात उद्यापासून महानगरपालिका क्षेत्रात रात्री 11 ते पहाटे 6 पर्यंत संचारबंदी लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला असून 5 जानेवारीपर्यंत ते लागू राहील. त्याचबरोबर संपूर्ण युरोप आणि मध्य-पूर्व देशांतून येणाऱ्या सर्व प्रवाशांना ते विमानतळावर उतरल्यापासून 14 दिवस संस्थात्मक क्वारंटाईन करण्याचा तसेच अन्य देशांमधून येणाऱ्या प्रवाशांना होम क्वारंटाईन करण्याचा निर्णय घेण्यात आला. कोरोनाच्या या नव्या विषाणूमुळे राज्यात अधिकची खबरदारी घेण्यात येत असून पुढील १५ दिवस अधिक सतर्क रहावे लागेल, असे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी यावेळी सांगितले.वर्षा निवासस्थानी झालेल्या बैठकीस मुख्य सचिव संजय कुमार, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सल्लागार अजोय मेहता, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव मनोज सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव आशिषकुमार सिंह, प्रधान सचिव विकास खारगे, मुंबई महापालिका आयुक्त आय. एस. चहल, मुंबई पोलिस आयुक्त परमबीर सिंह, आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. प्रदीप व्यास, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव सौरव विजय, राज्य टास्क फोर्सचे अध्यक्ष डॉ. संजय ओक, सदस्य डॉ. शशांक जोशी, डॉ. अविनाश सुपे, डॉ. राहूल पंडीत, मुख्यमंत्र्यांचे पुणे विभागाचे सल्लागार दीपक म्हैसेकर आदी यावेळी उपस्थित होते.तसेच ब्रिटन मध्ये आढळून आलेला नवा कोरोना विषाणू वेगाने पसरत असून या विषाणुची घातकता पुढील काही दिवसात कळेल त्यामुळे आजपासूनच राज्यात यासंदर्भात अधिकची सतर्कता बाळगली जात असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. आंतरराष्ट्रीय प्रवाशांची कडक तपासणी करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.संपूर्ण युरोपीय देशांसह मध्य-पूर्व देशांकडून महाराष्ट्रात उतरणाऱ्या प्रवाशांना आजपासून १४ दिवस संस्थात्मक क्वारंटाईन बंधनकारक करण्यात आले आहे.

अशा प्रवाशांना क्वारंटाईन केल्यानंतर त्यांची पाचव्या अथवा सातव्या दिवशी कोरोनाची चाचणी (आरटीपीसीआर) केली जाईल असे महत्वपूर्ण निर्णय या बैठकीत घेण्यात आले.


( मुंबई पब्लीक ट्रस्ट कायदा 1950 नुसार रजिस्टर रजि.न.ई/7482/ठाणे 11-04-2012 ) प्राप्तीकर कायदा 1961 च्या 80G अंतर्गत र सवलतीस पात्र )
THN/C.I.T.-I/Tech.1/12A/32/2013-14 w.e.f 10/12/2012 THN/C.I.T-I/Tech.1/80G/36/2013-14 w.e.f 10/12/2012
www.asraytrust.com Email : asraytrust2012@gmail.com

आश्रय ट्रस्ट

सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक

कला, साहित्य, सांस्कृतिक, शैक्षणिक व वैद्याकिय क्षेत्राला वाहून घेतलेली पंजीकृत संस्था

NITI AAYOG UNIQUE ID : MH/2018/0196753

संस्थापक

दिपक मोरेश्वर नाईक



5 राजाराम अपार्टमेंट, नवघर रोड, भाईंदर ( पूर्व ), ठाणे. 401105
9594418181 / 8424989898 / 9664966499 / 7400001474



हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ). संपर्कः-9594418181 / 8424989898